शा.मु.को.-- वाय ५३ (६ पा. × २५ संच = १ पु. × १०,००० पु.)-५.२००९

Form : 1-A

# FIRST INFORMATION REPORT
पहिली खबर

(Under Section 154 Cr. P. C.)
(फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये)

No. 203349

1. *Dist. ठाणे जिल्हा *P.S. बदलापूर (पु) पोलीस ठाणे *Year २०१८ वर्ष *FIR No. I १२० पहिली खबर क्र. *Date ३१/१२/२०१८ तारीख

2\. (i) *Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि. सन १९८८ (सुधारणा २०१८) अधिनियम *Sections : ७ प्रमाणे कलमे

(ii) *Act : अधिनियम *Sections : कलमे

(iii) *Act : अधिनियम *Sections : कलमे

(iv) *Other Acts & Sections : — इतर अधिनियम व कलमे

3\. (a) *Occurrence of Offence : *Day : ........ *Date From : २६/१२/२०१८ *Date To : २७/१२/२०१८
अपराधाची घटना वार तारीख पासून तारीख पर्यंत

*Time Period : ........ *Time From : १३:३४ *Time To : २३:५०
वेळेचा अवधी पासून पर्यंत

(b) Information received at P. S. Date : ३१/१२/२०१८ *Time : १०:२३
पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याची तारीख वेळ

(c) General Diary Reference Entry No. (s) : ३४/२०१८ *Time : १०:२३
सर्वसाधारण रोजनिशीचा संदर्भ क्र. वेळ

4\. Type of Information : फिर्याद *Written / Oral : लेखी
माहितीचा प्रकार लेखी / तोंडी

5\. Place of Occurrence : (a) *Direction and Distance from P.S. उत्तरेस ३ कि.मी. *Beat No. :
घटनेचे ठिकाण पोलीस ठाणे पासून दिशा व अंतर गस्तक्षेत्र क्र.

(b) *Address कुळगाव बदलापूर नगरपरिषद, बदलापूर (पूर्व)
पत्ता

(c) In case outside limit of this Police Station, then the
या पोलीस ठाण्याच्या हद्दीच्या बाहेर असल्यास, त्या पोलीस ठाण्याचे नांव

Name of P. S. : — Dist. :
पोलीस ठाणे जिल्हा

6\. Complainant / Informant :
तक्रारदार / खबरी

(a) Name : अमोल बाळकृष्ण सोरमे
नांव

(b) Father's / Husband's Name : बाळकृष्ण सोरमे
पित्याचे / पतीचे नांव

(c) Date / Year of Birth : ३० वर्ष (d) Nationality : भारतीय
जन्म तारीख / वर्ष राष्ट्रीयत्व

(e) Passport No. : — Date of Issue : Place of Issue :
पारपत्र क्र. दिल्याची तारीख दिल्याचे ठिकाण

(f) Occupation : नोकरी (पोलीस निरीक्षक)
व्यवसाय

(g) Address : ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे
पत्ता

Scanned by CamScanner

Form : 1-B

Details of Known / suspected / unknown accused with full particulars :
माहित असलेल्या / संशयीत / माहित नसलेल्या आरोपीचा संपूर्ण तपशील :
(Attach separate sheet if necessary)
(आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा)

No. 203349

कोनाराम महादु थोरे (लिपिक कुळगाव बदलापुर नगरपरिषद)

Physical features, deformities and other details of the suspect :
संशयीतांची शारीरिक ठेवण, व्यंग आणि इतर तपशील :

| *Sex लिंग | *Date/Year of Birth जन्मतारीख / वर्ष | *Build बांधा | *Height in Cms. उंची (सें.मी. मध्ये) | *Complexion वर्ण | *Identification Mark(s) ओळख |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| | | | | | |

| *Deformities/Peculiarities व्यंग/वैशिष्ट्ये | *Teeth दात | *Hair केस | *Eye डोळे | *Habit (s) सवयी | *Dress Habits पोशाखाच्या सवयी |
|---|---|---|---|---|---|
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| | | | | | |

| *Languages/Dialect भाषा / बोली भाषा | PLACE OF | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | *Burn Mark भाजल्याची खूण | *Leucoderma कोड | *Mole तीळ | *Scar - व्रण | *Tattoo गोंदण |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| | | | | | |

These fields will be entered only if Complainant/Informant gives any one or more particulars about the suspect. This will be used only for the purpose of preliminary retrieval to assist I. O.

जर तक्रारदार / खबरीने संशयीत बद्दल वरील १ किंवा अधिक रकान्यातील माहिती दिली तरच भरावी. तपास अधिकाऱ्याने प्राथमिक पातळीवर तपास करण्यासाठी वरील माहिती उपयोगात आणावी.

A database created will subsequently link one suspect in several cases, if any.

या अनुषंगाने तयार झालेल्या माहितीचा उपयोग संशयीताचा इतर गुन्ह्यांतील सहभाग स्पष्ट करेल.

A comprehensive and complete data on all fields will again be prepared when any accused is arrested irrespective of previous suspicion.

वरील रकान्यातील संपूर्ण माहिती ज्यावेळी संशयीतास अटक करण्यात येईल त्यावेळी पुनःश्च तयार करावी.

Scanned by CamScanner

No. 203349

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant :
तक्रारदाराने / खबऱ्याने तक्रार करण्यातील विलंबाची कारणे :
विलंब नाही

9. Particulars of properties stolen / involved (Attach separate sheet if necessary) :
चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) :

10. *Total value of properties stolen / involved :
चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य :

11. *Inquest Report / U. D. Case No., if any :
मरणान्वेषण अहवाल / यु. डी. प्रकरण क्र., जर असल्यास :

12. F. I. R. Contents (Attach separate sheets, if required) :
पहिल्या खबरीतील हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावेत) :

ना.भू. ठाणे व नागरी कुळकायदा ... नगरपरिषद अंतर्गत कार्यरत असलेले
आरोपी श्री. ... त्यांना लोकसेवक या नात्याने मिळालेल्या अधिकाराचा व
पदाचा दुरुपयोग करुन स्वतःचा आर्थिक फायदा करुन घेण्यासाठी तक्रारदार
यांचे ... कमी करुन दिल्याबद्दल
त्यांचेकडे १५,०००/- रु. रकमेची मागणी करुन पैकी १०,०००/- रु. लाच
स्विकारल्याचे ... निष्पन्न झाले म्हणून गुन्हा

13. ... registered the case and took up the investigation/directed* ... Rank ... to take up the investigation/Refused investigation/transferred to P. S. ... on point of jurisdiction.
केलेली कार्यवाही : बाब क्र. २ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये, अपराध घडल्याचे वरील अहवालावरून दिसून आल्यामुळे प्रकरण नोंदवले आणि तपासाचे काम हाती घेतले दिपक केरे
पदनाम पो.नि. (अॅन्टी करप्शन ब्युरो ठाणे) यांना तपासाचे काम हाती घेण्याचा निर्देश दिला / तपास करण्याचे नाकारले / अधिकारितेच्या मुद्यावर ... पोलीस ठाण्याकडे हस्तांतरीत केले.

F.I.R. read over to the Complainant/Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/Informant free of cost.
पहिली खबर तक्रारदाराला / खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदवली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला / खबरीला प्रत मोफत दिली.

[signature]

14. Signature/Thumb impression of the Complainant/Informant.
तक्रारदाराची / खबरीची सही / अंगठ्याचा ठसा

[signature]

Signature of the Office-in-charge, Police Station
पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याची सही

*Name आर.सी. शेख
नांव

*Rank पो.नि. No. :
पदनाम क्रमांक

15. Date & Time of despatch to the court :
कोर्टात पाठविल्याची तारीख व वेळ

Scanned by CamScanner

फिर्याद

दिनांक ३१/१२/२०१८

मी, सलील बाळकृष्ण भोसले, वय ३७ वर्षे, पोलीस निरीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे सरकारतर्फे फिर्याद लिहुन देतो की,

आम्ही दिनांक २६/१२/२०१८ रोजी अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथील कार्यालयात हजर असताना मा. पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांनी तक्रारदार श्री. राजाराम नामा गवळी, वय-६२ वर्षे, व्यवसाय-प्लंबर, राह. संत रोहिदास नगर, एम.आय.डी.सी. रोड, बदलापुर पुर्व, जि.ठाणे यांची एका लोकसेवका विरूध्द लाचेच्या मागणीची तक्रार असल्याचे सांगितले व तक्रारदार यांची तक्रार घेवून पुढील कारवाई करणेबाबत आदेश दिले. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. राजाराम नामा गवळी, यांची तक्रार त्यांनी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलेखीत करण्यात आली असुन तिचा आशय खालील प्रमाणे.

तक्रारदार यांनी सन २०१० साली सौ. जानकीबाई गौ. वाघ व इतर यांचेकडून कवटेवाडी शिरगाव, बदलापुर येथील सातबारा कमांक. १४१-३ ही जागा नव्यानव्व वर्षाच्या कारारवर विकत घेतली होती. सदर जागेवर त्यांनी सन २०१४ साली बांधकाम सुरू करून सात रूमची एक चाळ बांधवयास घेतली. सदर चाळीचे बांधकामाचे दरम्यान त्यांनी चाळीमधील तिन रूम विकल्या. त्यानंतर त्यांनी पुन्हा सदर जागेच्या समोरील बाजुस दोन रूम बांधल्या आहेत. अशा एकुण नऊ रूम त्यांनी बांधल्या अहेत. सदर रूम पैकी रूम नं. १, २ या त्यांच्या नावावर असुन रूम नं. ४,५ व ६ या त्यांचे व त्यांची पत्नी सौ. राणी राजाराम गवळी हिच्या नावावर आहेत. रूम नंबर ७ ही त्यांचा मुलगा गणेश राजाराम गवळी यांचे नावावर केली आहे. उर्वरित तीन रूम त्यांनी विकल्या आहेत. सदरच्या सर्व रूमला टॅक्स लावण्यात आला असुन सन २०१५-१६ सालच्या टॅक्स भरण्यात आला आहे, त्यावेळी नगरपरिषदेच्या टॅक्स विभागाला श्री. भले हे लिपीक होते. तक्रारदार यांच्या मालकीच्या रूमला सन २०१६-२०१७ साला पासुन आजपावेतो टॅक्स पावत्या आलेल्या नाहीत. सदरबाबत तक्रारदार यांनी बऱ्याच वेळा नगरपरिषद कार्यालयात जावुन विचारणा केली होती.

दिनांक २२/१२/२०१८ रोजी कुळगांव बदलापुर नगरपरिषद येथील कर्मचारी श्री. भले यांनी तक्रारदार यांच्या मोबाईल नंबर वर संपर्क करून तुमच्या रूमचा टॅक्स भरणे बाकी असुन मी तुमचा टॅक्स कमी करतो असे सांगुन तुम्ही मला येवुन भेटा असे सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी त्याच दिवशी कुळगांव बदलापुर नगरपरिषद येथे जावुन लोकसेवक श्री. भले यांची भेट घेतली असता तक्रारदार यांना एका कागदावर १९,७३४/- रूपये प्रमाणे तक्रारदार यांच्या नावावरील ५ रूमचे ९८,६७०/- रूपये एवढा टॅक्स भरावा लागेल असे सांगितले असता, तक्रारदार यांनी खुप जास्त होतात काही कमी करा असे सांगितले असता लोकसेवक श्री. भले यांनी १२,४२०/- रूपये प्रमाणे ५ रूमचे ६२,१००/- रूपये एवढे कमी करून देतो सांगुन उर्वरित ३६,५७०/- रूपये भरावे लागतील असे सांगितले. तसेच सदरची रक्कम कमी करण्यासाठी त्यांना व मालमत्ता कर विभागातील कर्मचारी यांना १५,०००/- रूपये दयावे लागतील असे सांगितले. तक्रारदार यांनी माझ्या पत्नीशी बोलुन मी तुम्हाला पैसे देतो असे सांगुन ते तेथुन निघुन आले.

Bhosale

( सलील भोसले )
पोलीस निरीक्षक
अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

Scanned by CamScanner

लोकसेवक श्री. भले यांनी तक्रारदार यांच्या नावावर असलेल्या कवटेवाडी शिरगाव, बदलापुर येथील पाच रूमला मालमत्ता कर कमी करून देण्याकरीता स्वत:साठी व मालमत्ता कर विभागातील कर्मचारी यांचेसाठी १५,०००/- रूपये लाचेची मागणी केली आहे. तक्रारदार यांना लाच दयायची ईच्छा नसुन तक्रारदार यांचा व लोकसेवक यांचेशी कोणताही आर्थिक व्यवहार झालेला नाही. त्यामुळे कुळगाव बदलापुर नगरपरिषद येथील कर्मचारी श्री. भले यांचेविरूध्द कारवाई होण्यासाठी दिनांक २६/१२/२०१८ रोजी लेखी तक्रार देण्यात आली.

सदर तक्रारीवरून दिनांक २६/१२/२०१८ रोजी कायदेशीर बाबींचा अवलंब करून लोकसेवक श्री. भले यांना कुळगाव बदलापुर नगरपरिषद येथे लोकसेवक यांची भेट घेण्याकरीता पंच नं.१ श्री भुतल यांचेसोबत पाठवून पडताळणी केली असता, केलेल्या पडताळणी वरून, लोकसेवक श्री. भले यांनी तक्रारदार यांचे रूमचे प्रलंबित असलेले मालमत्ता बिल कमी करून दिल्याबद्दल तक्रारदार यांचेकडे १५,०००/-रू रकमेची मागणी करून त्यापैकी १०,०००/-रू स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. परंतु सापळा कारवाई वेळी लोकसेवक यांनी लाचेच्या रक्कमेचा स्विकार न करता तक्रारदार यांना नंतर या असे सांगितल्याने त्याबाबतचा सविस्तर पडताळणी- सापळापुर्व-सापळा परतीचा पंचनामा करण्यात आला.

त्यानंतर दिनांक २७/१२/२०१८ रोजी दोन पंच साक्षीदारांसमक्ष कायदेशीर बाबींची पुर्तता करुन सापळा कारवाई करण्यात आली होती. केलेल्या कारवाईत लोकसेवक श्री.भले यांनी तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम न स्विकारता पावती भरा असे सांगितल्याने सापळा कारवाई करण्यात आली नाही. पावत्यांचे पैसे भरल्याखेरीज तक्रारदार यांचेकडुन लोकसेवक श्री भले हे पैसे घेण्याची शक्यता नसल्याने तक्रारदार यांनी त्यांना पावत्यांचे पूर्ण पैसे जमा करण्यासाठी सोमवार दि. ३१/१२/२०१८ पर्यंत वेळ मागितली. त्यानुसार तक्रारदार यांचे पावत्यांकरिता भरण्याचे पूर्ण पैसे जमा झाल्यावर पुढील सापळा कारवाई करण्याचा निर्णय पंचासमक्ष घेण्यात आला.

दि. ३१/१२/२०१८ रोजी तकारदार हे समक्ष कार्यालयात हजर होवुन त्यांनी जबाब लिहुन दिला की, दि. २८/१२/२०१८ रोजी ते कुळगाव बदलापुर नगरपरिषद कार्यालयात गेले असता त्यांना गेटवरच लोकसेवक श्री. भले हे भेटले. त्यावेळी लोकसेवक श्री भले यांनी त्यांना " तुम्ही तिकडे जा व तुमच तुम्ही बघुन घ्या'' असे सांगितले. त्यामुळे ते मालमत्ता विभागात गेले व तेथे हजर असलेल्या एका लिपीक महिलेस भेटुन तिला त्यांचे रूम क्रमांक व गाव सांगितले असता, तिने संगणकावरून त्यांना सन २०१८-२०१९ चे रूम क्र. १,२,४,५,६ मौजे कवटे वाडी, शिरगाव येथील रूमचे मालमत्ता पावत्या दिल्या. नमुद सर्व पावत्यांवर एकुण देय रक्कम हि १९७३४/-रू प्रत्येकी होती. त्यामुळे त्यांनी त्या मॅडमला मी एवढे पैसे भरू शकत नाही असे सांगितले असता त्यांनी पावती वरील रक्कम कमी करून प्रत्येक रूमचे ७४९६/-रू. भरावे लागतील असे सांगितले. त्यांचे जवळ तेवढे पैसे नसल्याने त्यांनी प्रत्येक रूमचे ४०००/- रू. याप्रमाणे ०५ रूमचे २००००/- रू भरले व त्यांचे कडुन पावत्या घेतल्या. लोकसेवक हे आता त्यांचेकडुन पैसे स्विकारणार नाही अशी त्यांची खात्री झाली आहे. दिनांक

Bhosale

( सलील भोसले )
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

Scanned by CamScanner

२६/१२/२०१८ रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईत लोकसेवक श्री. कांताराम महादु भले, लिपीक कुळगाव-बदलापुर नगरपरिषद यांनी त्यांचेकडे लाचेची मागणी केल्याने त्यांच्या विरूध्द कायदेशीर कारवाई करावी अशी विनंती तक्रारदार यांनी त्यांचे जबाबात केली आहे.

प्रस्तुत प्रकरणी पुढील कारवाई करण्यासाठी सविस्तर अहवाल मा.पोलीस अधीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांचेकडे सादर करण्यात आला होता. सादर केलेल्या अहवालावरून मा. पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांनी त्यांचेकडील जा.क्र. असीबी/ठाणे/भले लिपीक, बदलापुर नप/२०१८/४६६५, दिनांक ३१/१२/२०१८ रोजीचे आदेशानुसार प्रस्तुत प्रकरणातील कुळगांव बदलापूर नगरपरिषद अंतर्गत असलेले लिपीक श्री.कांताराम महादु भले यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७ नुसार गुन्हा दाखल करून केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

तरी कुळगांव बदलापूर नगरपरिषद अंतर्गत कार्यरत असलेले लिपीक श्री.कांताराम महादु भले यांनी त्यांना लोकसेवक या नात्याने मिळालेल्या अधिकाराचा व पदाचा दुरुपयोग करुन स्वत:चा आर्थिक फायदा करून घेण्यासाठी तक्रारदार यांचे रूमचे प्रलंबित असलेले मालमत्ता बिल कमी करून दिल्याबद्दल त्यांचेकडे १५,०००/-रू रकमेची मागणी करून त्यापैकी १०,०००/-रू लगेचच स्विकारण्याचे मान्य केले असल्याचे निष्पन्न झाले म्हणून त्यांनी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७ प्रमाणे दंडनिय अपराध केल्याने माझी कुळगांव बदलापूर नगरपरिषद अंतर्गत कार्यरत असलेले लोकसेवक लिपीक श्री. कांताराम महादु भले यांचेविरूध्द सरकारतर्फे फिर्याद आहे.

Bhosale

( सलील भोसले )
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

Scanned by CamScanner